भारतीय पृथ्वि विज्ञान मंत्रालय, भारतीय हवामान शास्त्र विभाग आणि
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली सहयोगीत

# –: ग्रामिण कृषि मौसम सेवा प्रकल्प :–

उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला पत्रक - सिंधुदुर्ग

## कालावधी (दिनांक २६.१०.२०१९ ते ३०.१०.२०१९)

| अंक ८६/२०१९ | दिनांक २५.१०.२०१९ | कालावधी ५ दिवस |
|---|---|---|

| मागील आठवड्यातील हवामान घटकांची प्रत्यक्ष नोंद (१९/०९/२०१९ ते २५/१०/२०१९ पर्यंत) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचे हवामान घटकांचे पूर्वानुमान (वैधता २६/१०/२०१९ ते ३०/१०/२०१९ पर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९/१० | २०/१० | २१/१० | २२/१० | २३/१० | २४/१० | २५/१० | दिनांक | २६/१० | २७/१० | २८/१० | २९/१० | ३०/१० |
| ३१.६ | २६.० | ४७.६ | ८.४ | ४.५ | ३९.५ | ५६.८ | पाऊस (मि. मी) | ३५ | १२ | ० | ६ | ८ |
| ३१.५ | ३१.० | ३३.५ | ३३.५ | ३०.० | २९.० | २७.० | कमाल तापमान (अं. से) | २७ | २८ | २९ | ३१ | ३२ |
| २३.० | २३.० | २३.० | २३.० | २३.० | २३.० | २३.० | किमान तापमान (अं. से) | २२ | २३ | २२ | २२ | २३ |
| ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | सकाळ - मेघाच्छादन (ऑक्टा.) | ८ | ८ | ७ | ५ | ५ |
| ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | दुपार - मेघाच्छादन (ऑक्टा.) | | | | | |
| ९५ | ९५ | ९५ | ९३ | ९५ | ९५ | ९५ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ९३ | ९१ | ९४ | ९३ | ८९ |
| ८६ | ७८ | ५५ | ८४ | ८६ | ९० | | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ९० | ८० | ६६ | ६१ | ५८ |
| ०.४ | ०.९ | १.२ | २.० | २.० | २.८ | ३.२ | वा-याचा वेग (कि.मी/तास) | ०२४ | ०११ | ००८ | ००५ | ००८ |
| स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | ईशान्य | ईशान्य | सकाळ - वा-याची दिशा | दक्षिण कडून | आग्नेय कडून | पुर्वे कडून | ईशान्य कडून | पुर्वे कडून |
| पश्चिमे | पश्चिमे | पश्चिमे | दक्षिणे | आग्नेय | ईशान्य | | दुपार - वा-याची दिशा | | | | | |

| मागील वर्षातील (२०१८) पर्जन्य (मि. मी) | १/०१/२०१९ पासुनचे पर्जन्य (मि. मी) | १/०६/२०१९ पासुनचे पर्जन्य (मि. मी) | मागील आठवड्यातील पर्जन्य (मि.मी) |
|---|---|---|---|
| ३२६९.२ | ४४७५.६ | ४४७५.६ | २१४.४ |

**पुढील ५ दिवसाच्या हवामानाची सामान्य स्थिती:** येत्या ५ दिवसात जिल्ह्यात मध्यम स्वरुपाचा पाऊस पडण्याची शक्यता असुन वातावरण ढगाळ राहण्याची शक्यता आहे.

## हवामान पुर्वानुमान कृषि सल्ला

| पिकाचे नाव | पिकाची अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| भात | काढणी | भात कापणीसाठी विद्यापीठाने विकसीत केलेल्या “वैभव विळ्याचा” वापर करावा जेणेकरुन भात जमिनीलगत कापले जाईल.<br>जिल्ह्यात ज्या ठिकाणी भात पिकांची कापणी करण्यात आली आहे अशा ठिकाणी कापलेल्या भाताच्या पेंड्या झाकुन ठेवण्यात याव्यात व ज्यांना कापणी करावयाची आहे त्यांनी पाऊसाचा अंदाज पाहून कापणी करावी. |
| भुईमुग | आरा ते शेंगा | भुईमुगावर टिक्का रोगाचा प्रादुर्भाव आढळुन आल्यास नियंत्रणासाठी कार्बेडॅझिम १० ग्रॅम किंवा डायथेन एम - ४५ २० ग्रॅम प्रती १० ली पाण्यातुन फवारावे. |
| कुळीथ व चवळी | पेरणी | कुळीथाची व रब्बी हंगामातील चवळी पिकाची पेरणी १५ ऑक्टोबर ते नोव्हेंबर अखेर पर्यंत करावी.<br>पेरणीसाठी दापोली - १ व कोकण सदाबहार, कोकण सफेद या अनुक्रमे कुळीथ व चवळी या पिकाच्या सुधारीत जातींचा वापर करावा.<br>कुळीथ व चवळी पिकाची पेरणी ३०x१५ सेमी या अंतरावर करावी. साधारणतः कुळीथासाठी प्रती हेक्टरी १८ ते २० किलो व चवळीसाठी प्रती हेक्टरी १५ ते १८ किलो बियाणे पुरते, बियाण्यास प्रती किलोस २.५ ग्रम थायरम या बुरशीनाशकाची व नंतर २५ ग्रम रायझोबीयम या जीवाणु संवर्धकाची बीज प्रक्रिया करावी. कुळीथासाठी २५ किलो नत्र, ५० किलो स्फुरद आणि ६० किलो पालाश व चवळीसाठी २५ किलो नत्र आणि ५० किलो स्फुरद या अन्नद्रव्याची मात्रा ओळीत सरीमध्ये बुजवुन द्यावी. |
| कडवा वाल | पेरणी | पिकाची पेरणी ऑक्टोबर व नोव्हेंबर मध्ये ३०x१५ सेमी किंवा ३०x२० सेमी किंवा ३०x३० सेमी या अंतरावर नांगरा पाठोपाठ करावी.<br>पेरणीसाठी पिकाच्या कोकण वाल -१ व कोकण वाल -२ या सुधारीत जातींचा वापर करावा.<br>पाभरीणे पेरणी केल्यास साधारणतः प्रती हेक्टरी ५० ते ६० किलो बियाणे पुरते. बियाण्यास प्रती किलोस ३.० ग्रम थायरम या बुरशीनाशकाची व नंतर २५ ग्रम रायझोबीयम या जीवाणु संवर्धकाची बीज प्रक्रिया करावी.<br>पिकास ५० किलो स्फुरद या अन्नद्रव्याची मात्रा ओळीत बियाण्याखाली साधारण ५ सेमी खोलीवर द्यावी. |
| आंबा | पालवी | आंब्यामध्ये नविन पालवी आली असल्यास त्या पालवीचे तुडतुडे, शेंडा पोखरणारी अळी, पाने पोखरणारी अळी आणि मिजमाशीपासून आवश्यकतेनुसार संरक्षण करावे. त्यासाठी २५% प्रवाही डायमिथोएट किंवा ३६% प्रवाही मोनोक्रोटोफॉस ११ मिलि प्रति १० लि पाण्यात मिसळुन फवारणी करावी. |
| काजु | पालवी पुर्व | काजुवर खोडकिडा (रोठा) या किडिचा प्रादुर्भाव आढ्ळुन आल्यास १५ मि.मी. पटाशिच्या सहाय्याने प्रादुर्भित साल काढून झाडातील रोठ्याला बाहेर काढून मारुन टाकावे व तो भाग २०% प्रवाही क्लोरोपायरीफॉस ५० मी.लि. १० लिटर पाण्यामध्ये मिसळून चांगला भिजवावा. काजुमध्ये जुन्या व रोगट फांद्या कापल्यानंतर त्या ठीकाणी १% बोर्डोमिश्रन लावावे. |
| नारळ | फुलोरा | विद्यापिठाने शिफारस केल्याप्रमाणे नारळाला खताचा दुसरा हप्ता ७५० ग्र. युरिया ६६० ग्र. म्युरेट ऑफ पोटॅश प्रति माड या प्रमाणात द्यावा. खते द्यावयाच्या वेळी जमिनीत पुरेसा ओलावा असेल याची खात्री करावी. |
| माती परिक्षण | - | जमिनीतील नत्र, स्फुरद व पालाशाचे प्रमाण तपासण्यासाठी खरीप पीकाची काढणी केल्यानंतर लगेचच मातीचा नमुना घ्यावा व तपासणीसाठी जवळच्या माती परिक्षण प्रयोगशाळेकडे पाठवावा. मातीचा नमुना कसा घ्यावा याबाबत अधिक माहीतीसाठी मृद शास्त्रज्ञ, प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले यांचेकडे संपर्क साधावा. (दुरध्वनी क्र. ०२३६६-२६२२३४) |

सदर कृषि सल्ला पत्रिका ही डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाच्या, प्रादेशीक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले व उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे येथील “ग्रामीण कृषि मौसम सेवा” योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशी वरुन तयार करुन प्रकाशित करण्यात आली.


| डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर<br>सहयोगी अधिष्ठाता<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग | डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर<br>नोडल ऑफिसर<br>(ग्रामिण कृषि मौसम सेवा)<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>(०२३६२-२४४२३१) | डॉ. यशवंत चं. मुठाळ<br>तांत्रिक अधिकारी<br>ग्रामिण कृषि मौसम सेवा<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>(०२३६२-२४४२३१) |
|---|---|---|